www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 192 वा शुक्रवार दि. 28 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

# 'एमपीएससी' वर्णनात्मकच यंदापासून यूपीएससीच्या धर्तीवर परीक्षा घेण्याचा निर्णय

## फेरविचार करणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांचे स्पष्टीकरण

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**

**मुंबई** : येत्या वर्षापासून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षाही वर्णनात्मक स्वरूपात घेण्यात येणार आहेत. या निर्णयाचा फेरविचार केला जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत बुधवारी स्पष्ट केले. लोकसेवा आयोगाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचा निर्णय २०२२मध्ये घेण्यात आला. सुरुवातीला २०२३ मध्ये हा बदल होणार होता. मात्र विद्यार्थ्यांच्या मागणीनंतर त्याची अंमलबजावणी २०२५पासून करण्याची घोषणा सरकारने केली. या निर्णयाचा फेरविचार केला जाणार नसून तो मागे घेण्याचाही प्रश्न नाही, असे फडणवीस म्हणाले. काही कोचिंग क्लासेसच्या चालकांनी विद्यार्थ्यांना गोंधळात टाकण्याचा प्रयत्न केला असला तरी मुलांच्या भविष्यासाठी हा बदल गरजेचा असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**वयोमर्यादा वाढविण्याचा निर्णयमहाराष्ट्र अराजपत्रित गट 'ब' आणि गट 'क' सेवा संयुक्त पूर्व परीक्षांसाठी वयोमर्यादा वाढवण्याच्या मागणीचा सकारात्मक विचार केला आहे.संबंधित विभागाच्या मागणीपत्रांनुसार आणि नियमानुसार पोलीस उपनिरीक्षक परीक्षांसाठी एका वर्षाची वयोमर्यादा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माहिती तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांनी सांगितले. आयोग स्वायत्त असला तरी, विविध न्यायालयीन निर्णय, विधी व न्याय विभागाचे मत आणि सरकारच्या धोरणाच्या आधारे हा निर्णय घेण्यात आल्याचे ते म्हणाले. याबरोबरच उपनिरीक्षक, विक्रीकर निरीक्षक आणि एएसओ परीक्षांसाठी एक वर्ष वयोमर्यादा वाढवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

**निर्णयाची अंमलबजावणी २०२५ पासून करण्याचे निश्चित झाले आहे. या निर्णयाचा फेरविचार केला जाणार नाही. मुलांच्या भविष्यासाठी हा बदल गरजेचा आहे. वर्णनात्मक पद्धतीमुळे विद्यार्थी केंद्रीय लोकसेवेसाठी अधिक सक्षम होतील. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

द • ख • ल

## वाकडी येथे क्रिकेट स्पर्धांचे आयोजन

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

हर्ष इंटरप्राईजेस, हर्षल इंटरप्राईजेस, स्वरा इंटरप्राईजेस, ओम साई टूर्स अँड ट्रॅव्हल्स, आई गावदेवी क्रिकेट संघ, आई गावदेवी ४०+ मास्टर्स क्रिकेट संघ, ग्रीन एकर क्रिकेट संघ वाकडी आयोजित सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच, माजी उपसरपंच ग्रामस्थ मंडळ चषक 2025 डे नाईट क्रिकेट सामन्यांचे आयोजन 28 मार्च ते एक एप्रिल रोजी समर्थ मैदान, वाकडी येथे करण्यात आले आहे.

यावेळी प्रथम पारितोषिक एक लाख रुपये आणि चषक, द्वितीय पारितोषिक ५० हजार रुपये आणि चषक, तृतीय, चतुर्थ, पाचवे, सहावे पारितोषिक २५ हजार आणि चषक देण्यात येणार आहे. यावेळी मालिकावीराला मोटरसायकल, उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाजाला सायकल भेट म्हणून देण्यात येणार आहे.

# पनवेल तालुका पोलिसांकडून दंगा काबू योजनेची रंगीत तालीम



दैनिक युवक आधार

पनवेल, वार्ताहर : आगामी सण उत्सव गुढीपाडवा, रमजान ईद, श्रीराम नवमी, हनुमान जयंती तसेच नागपूर येथे घडलेल्या अप्रिय घटनेच्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील नेरे गाव, मार्केट परिसर या गर्दीच्या ठिकाणी दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर दंगा काबू योजना रंगीत तालीम मध्ये पोनि गुन्हे सह 03 सपोनि, 22 पोलीस अंमलदार, बीट मार्शल क्रमांक 5 वरील 2 अंमलदार, निर्भया मोबाईल, पनवेल तालुका 1 मोबाईल, पीटर मोबाईल(डायल 112) यांच्या सह पनवेल महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील अग्निशामक वाहन सह 01 अधिकारी आणि 06 कर्मचारी व उपजिल्हा रुग्णालय, पनवेल कडील 01 रुग्णवाहिका सह एक डॉक्टर व दोन कर्मचारी असे उपस्थित होते.

# दीपक फर्टिलायझर्सकडून तळोजा एमआयडीसी परिसरातील ४१ गावांमध्ये आरोग्यसेवा

दैनिक युवक आधार

पनवेल ( प्रतिनिधी): दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडने ग्रामीण भागातील नागरिकांसाठी दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. कंपनीच्या दोन फिरत्या दवाखान्यांच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील तळोजा एमआयडीसी आणि परिसरातील ४१ गावांमध्ये आरोग्यसेवा पुरवली जात आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये या उपक्रमांतर्गत २७,८१८ हून अधिक रुग्णांना सेवा देण्यात आली आहे. विशेषतः मर्यादित आरोग्य सुविधा असलेल्या नागरिकांसाठी या फिरत्या दवाखान्यांनी प्राथमिक आरोग्यसेवा सहज उपलब्ध करून दिली आहे. गेल्या चार वर्षांत ८०,००० हून अधिक रुग्णांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.




आरोग्यसेवा अधिक सुलभ करण्यासाठी नव्या सुविधा आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने दीपक फर्टिलायझर्सने तळोजा एमआयडीसीमधील देवीचा पाडा गावात पॅथॉलॉजी संकलन केंद्र सुरू केले आहे. येथे रक्त व मूत्र तपासण्या नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्याचा परिसरातील ३७ गावे आणि पाड्यातील रहिवाश्यांना थेट फायदा होत आहे.ही सेवा विशेषतः कामगार वर्गासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे, **पान २ वर**

# देशभरात यूपीआय व्यवहारांमध्ये अडचणी तासाभरात व्यवहार पूर्ववत

दैनिक युवक आधार
संपादक संतोष आमले

नवी दिल्ली : देशभरात युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात यूपीआयच्या माध्यमातून देयक व्यवहार पूर्ण करण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. यूपीआय वापरकर्त्यांना बुधवारी देयक व्यवहार पूर्ण करण्यास अडचणी येत असल्याचा सूर समाजमाध्यमातून व्यक्त झाला.

गूगल पे, पेटीएम आणि विविध बँकांच्या अॅपच्या माध्यमातून व्यवहारास अडचणी येत होत्या. निधी हस्तांतरणासह अन्य सेवांवरही याचा परिणाम दिसून आला. याबाबत 'नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया'ने (एनपीसीआय) स्पष्टीकरण देत हा तांत्रिक बिघाड असून तातडीने दोष दूर केल्याचे सांगितले.

सायंकाळी सात वाजेपर्यंत या संदर्भात सुमारे २३ हजार तक्रारी नोंदवल्या गेल्या. गूगल पेवर सर्वाधिक ७२ टक्के, संकेतस्थळांवर १४ टक्के आणि अॅपशी संबंधित मुद्द्यांबाबत १४ टक्के वापरकर्त्यांना अडचणी आल्या. स्टेट बँकेच्या माध्यमातून पैसे हस्तांतरणात ४७ टक्के अडचणी आल्या. एकूण ८४ टक्के यूपीआय वापरकर्त्यांचा रक्कम हस्तांतरित करण्यात अडचणी निर्माण आल्याच्या तक्रारी होत्या. दुपारनंतर सुरू झालेल्या तक्रारींमध्ये सायंकाळी सातच्या सुमारास मोठी वाढ झाली.






## संपादकीय

# ३०० दशलक्ष मेट्रिक टन दुध उत्पादनाचे उद्दिष्ट्य

देशाचे दूध उत्पादन जागतिक स्तरावर पाहता ३०० दशलक्ष मेट्रिक टनपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पुढील पाच वर्षांमध्ये हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे. पंतप्रधान मोदी सरकारने राष्ट्रीय गोकुळ मिशन ही योजना २०१४ मध्ये सुरू केली असून या अंतर्गत देशातील दूध उत्पादनामध्ये ६३ टक्के इतकी वाढ झाली आहे. जागतिक स्तरावर पाहता दूध उत्पादनामध्ये भारत हा आघाडीवरचा देश आहे. येणाऱ्या पाच वर्षांच्या काळामध्ये ३०० दशलक्ष मेट्रिक टन इतक्या दुधाचे उत्पादन करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. सध्याला पाहता भारत देशात २४९ दशलक्ष मेट्रिक टन इतक्या दुधाचे उत्पादन घेतले जात आहे. केंद्रीय पशु पालन आणि डेअरी विभागाचे केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंग यांनी लोकसभेमध्ये ही माहिती दिली आहे. आगामी पाच वर्षांमध्ये वर निर्धारित केलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असून ३ वर्षांमध्येच १५ टक्के इतके वाढीव उत्पादन साध्य केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. जागतिक स्तरावर पाहता दूध उत्पादनामधला भारत हा सर्वात मोठा देश ठरला आहे. देशातील दूध उत्पादनाचा विचार करता आजघडीला जवळपास १० कोटी लोक दूध उत्पादनाशी जोडले गेले आहेत. त्यांच्याकडून दूध उत्पादनासाठी आवश्यक ते प्रयत्न केले जात असून सरकारही त्यांना प्रोत्साहन देत आहे.काहीजण शेती करण्यासोबत जोडधंदा म्हणून दुध उत्पादन घेतात. देशातील शहरीपेक्षा ग्रामीण भागात दुग्ध व्यवसाय अधिक दिसून येतो. या व्यवसायातसुद्धा महिलांचे योगदान ७५ टक्के इतके आहे. सध्याला देशामध्ये पाहता प्रतिव्यक्ती दुधाचा वापर हा ४७१ ग्राम इतका केला जातो. पशुपालन आणि डेअरी उद्योग विभागाकडून राष्ट्रीय गोकुळ मिशनचे आयोजन करण्यात आले आहे. दूध उत्पादनाशी संबंधित असलेल्या गाई-म्हशी यांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहेत. दूध उत्पादनामध्ये वाढीसाठी आवश्यक ते प्रयत्न करतानाच आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. सरकार दुग्ध उत्पादकांना आवश्यक वाटल्यास अर्थसहाय्यही पुरवत असते. त्याचप्रमाणे तांत्रिक मदतही केली जाते. कर्जाच्या माध्यमातूनही दुध उत्पादकांना सक्षम करण्याचा प्रयत्न होतो. डेअरी पायाभूत सुविधा, विपणन, दर्जा नियंत्रण, पोषक खाद्य, विमा यासारख्या बाबतीत सरकार नेहमीच सहकार्यासाठी पुढे असते.२०२४ मध्ये उत्पादनाचा विकास दर ३.७८ टक्के इतका राहिला जो याच्या मागच्या वर्षी ३.८ टक्के इतका होता. याआधीच्या वर्षामध्ये पाहता आर्थिक वर्ष २०१८ मध्ये उत्पादन दर ६.६२ टक्के इतका सर्वाधिक होता. त्यानंतर २०१९ मध्ये ६.४७ टक्के, २०२० मध्ये ५.६९ टक्के, २०२१ मध्ये ५.८१ टक्के, आर्थिक वर्ष २०२२ मध्ये ५.७७ टक्के इतका दर होता.

# महापालिकेच्यावतीने जागतिक क्षयरोग दिन साजरा

## सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून महापालिकेस सहकार्य केलेल्या संस्थाचा महापालिकेकडून सन्मान



दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी
औद्योगिक वसाहतींना आवश्यक असणाऱ्या विविध योजना महापालिका देण्याचा प्रयत्न करत आहे. येत्या काळात आंतराष्ट्रीय विमानतळ, इतर उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने लागणारे कौशल्ययुक्त मनुष्यबळ देण्यासाठी महापालिका विविध प्रशिक्षणे देत आहे. तसेच सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून कंपन्यानी महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले. जागतिक स्तरावर दरवर्षी २४ मार्च हा दिवस क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यासाठी 'जागतिक क्षयरोग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून महापालिकेस सहकार्य केलेल्या स्थानिक कंपन्यांचा, संस्थाचा पालिका मुख्यालयात आज दिनांक 26 मार्च रोजी सन्मानकरण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, पनवेल महानगरपालिका मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने , शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. माननीय पंतप्रधान महोदयांनी सन 2025 ला भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठेवलेले आहे जे की शाश्वत विकास ध्येयाच्या अपेक्षीत कालावधीपेक्षा पाच वर्ष अगोदर आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत 100 दिवसीय क्षयरोग मोहिम पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक 07 डिसेंबर 2025पासून राबविण्यास सुरूवात करण्यात आली होती. या मोहीम अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागामध्ये जसे कि झोपडपट्टी, वीटभट्टी, कामांसाठी स्थलांतरित झालेले कामगार ,बेघर, इतर सामाजिक गट, तसेच तुरुंग, वृद्धाश्रम, आश्रम शाळा , वस्तीगृह, बांधकाम स्थळावरील कामगार, इंडस्ट्रियल वर्कर यांची डिजिटल पोर्टेबल क्ष किरण मशीनद्वारे चाचण्या करण्यात आल्या होत्या. या मोहिमेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील एकूण लोकसंख्येच्या 15 टक्के प्रमाणे जोखीमग्रस्त नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी 33 हजार 450 छातीचे क्ष किरण चाचण्या करण्यात आल्या. त्यातील संशयित 4 हजार 390 जणांची क्षय रोगाची चाचणी (CBNAAT) करण्यात आली. या मोहिमे मध्ये 609 नवीन रुग्ण शोधण्यात आले व त्यांना मोफत उपचार चालू करण्यात आले आहेत. तसेच क्षय रुग्णांना निक्षय पोषण योजनेचाही लाभ देण्यात आला आहे. सामाजिक जबाबदारी अंतर्गत महापालिकेस 100दिवसीय क्षयरोग मोहीमेंतर्गत स्थानिक कंपन्या जसे कि इंडियन टंकसाल मुंबई यांनी चार डिजिटल हॅन्ड हेल्ड एक्स-रे मशीन सीएसआर फंडातून उपलब्ध करून दिले. तसेच इतर संस्था यामध्ये आयजी पेट्रो केमिकल, दीपक फर्टिलायझर, मिलन फार्मा इंडस्ट्रीज, बर्जर पेंट, हिन्दाल्को, एल अण्ड टी, एनएमए प्रोजेक्ट इत्यादींनी 100 दिवसीय क्षयरोग मोहीम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी योगदान केले. या सर्वांचा यावेळी आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच महापालिकेस नेहमी सहकार्य देत असलेल्या एमजीएम वैद्यकिय महाविद्यालय व तेरणा वैद्यकिय महाविद्यालय यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला. याबरोबरच या मोहिमेसाठी सहकार्य केलेल्या पूजा डायग्नोस्टीक कळंबोली व वन एक्सोर्ट सोल्युशन यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. सन 1882 साली रॉबर्ट कॉच शास्त्रज्ञांनी टीबी या जिवाणूचा शोध लावला. त्यानंतर 24 मार्च 1950 साली जागतिक आरोग्य संघटना यांनी मान्यता दिली म्हणून 24 मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. क्षयरोग हा लक्षात येण्याजोगा (NOTIFIABLE DISEASE) आजार आहे. तरीही सर्व सरकारी तसेच खाजगी आरोग्यसंस्था,प्रयोगशाळा,औषध भांडार,कंपनी यांनी प्रशासनास रूग्णाबाबत माहिती देणे बंधनकारक असल्याचे निर्देश मा. आयुक्त यांनी केले आहे.



# जय मातादी सेवा मंडळ श्री पहाडावाली माता व हेरंबा सिद्धिविनायक गणेश मंदिराच्या वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन



दैनिक युवक आधार
घाटकोपर,(केतन भोज); सिंहगड सहकारी गृह निर्माण संस्था,साईनाथ पुत्रण रोड,रामनगर(अ),घाटकोपर पश्चिम येथील प्रसिद्ध जागृत देवस्थान असलेल्या श्री पहाडावाली मातेचा (२३) वा व हेरंबा सिद्धिविनायक गणेश मंदिराचा (१७) वा वर्धापनदिनाचे सभासदांच्या प्रेमाने व देणगीदार,हितचिंतकांच्या मनापासून दिलेल्या सहकार्याने हा कार्यक्रम उत्तरोत्तर वृध्दिंगत होत असून,याही वर्षी मंदिराचा वर्धापनदिन सोहळा रविवार दि.३०/०३/२०२५ ते शनिवार दि.०५/०४/२०२५ या कालावधीत साजरा करण्यात येत आहे.यावेळी दैनंदिन कार्यक्रम रविवार दि.३० मार्च रोजी चैत्र शु.१ सकाळी ७ वाजता गुढीपाडवा,देवीचा व श्री गणेशाचा अभिषेक करण्यात येणार असून दुसऱ्या दिवशी सोमवार दि.३१ मार्च २०२५ ते गुरुवार दि.०३ एप्रिल २०२५ या कालावधीत चैत्र शु.२ ते चैत्र शु.६ गुरुवार दि.०३ एप्रिल रोजी रात्री ७ ते १० वाजता सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.त्यानंतर रात्री ९ वाजता आरती होणार आहे.तसेच शुक्रवार दि.०४ एप्रिल चैत्र शु.७ सायंकाळी ४ वाजता महाआरती होऊन देवीची व श्री गणेशाची पालखी मिरवणुक निघणार आहे.आणि शेवटी शनिवार दि.०५ एप्रिल रोजी चैत्र शु.८ सकाळी ६ ते ८ वा.अभिषेक त्यानंतर पुन्हा सकाळी ९ ते १२ या वेळेत होम हवन तसेच सायंकाळी ४ ते १० वाजता महाप्रसाद भंडारा आयोजित केला आहे तसेच देवी व गणेशाचा दर्शन सोहळा व मान्यवरांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

तरी या वर्धापनदिन सोहळ्यामध्ये सर्वांनी सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन जय मातादी सेवा मंडळाचे संस्थापक - प्रभाकर अचन्ना शेट्टी,संचालक - संजय शि.चिले,उपसंचालक - प्रदिप रां.भोगले,कार्याध्यक्ष - हेमंत कृ.शिंदे,अध्यक्ष -मनिष कृ.कदम,उपाध्यक्ष -शंकर तेलकर,सेक्रेटरी - गणेश शि.भगत, उपसेक्रेटरी - राकेश कृ.शिंदे,खजिनदार -संतोष भा.वाळुंज,उपखजिनदार - अंकुश रा.शिरवले तसेच महिला कार्यकारिणी हितचिंतक - सुलोचना सु.शेट्टी,संचालक - श्रीमती सुगंधा चं.पोतनीस,उपसंचालक-सौ. सुलोचना व.भालेकर,अध्यक्षा - सौ.शोभा ब. खांडगावकर, उपाध्यक्षा - सौ.श्रध्दा (सरिता) क.खेडस्कर,सेक्रेटरी - सौ.प्रिया(संगीता)प्र. शेट्टी, उपसेक्रेटरी सौ.मनिषा म.कदम,खजिनदार -सौ.मीनाक्षी वि. चिले,उपखजिनदार सौ. लक्ष्मी शं.तेलकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भारती विद्यापीठात जिंतीच्या सुपुत्राने दाखवला चित्रकलेत झेंडा




नवी मुंबई येथे भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी च्या अंतर्गत 'बहार २०२५ हा कार्यक्रम घेतला होता. दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जातो. अनेक चित्रकार चित्रकला प्रदर्शनात सहभाग घेतात. बरेच नामांकित चित्रकार आपापली चित्रकला प्रदर्शित करतात.

सन २०२५ साली घेण्यात आलेल्या बहार या कार्यक्रमात जन्मभूमी पण कर्मभूमी कामोठे येथे शिक्षण घेत चित्रकलेची आवड असणाऱ्या चि. प्रणव संजय पाटील यांनी चित्रकला प्रथम क्रमांक पटकावला. त्यावेळी प्राचार्य श्री.पी.एन टंडन यांनी विशेष कौतुक केले आणि मार्गदर्शन केले.तसेच जिंती , कामोठे परिसरातून प्रणव चे कौतुक होत आहे,

# पनवेल महापालिकेच्यावतीने भटक्या श्वानांचे व भटक्या मांजरांचे सर्वेक्षण

## देशात प्रथमच एआय प्रणालीचा वापर करून श्वानांची डिजिटल माहिती गोळा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
पनवेल महापालिकाद्दीतील भटक्या श्वानांचे सर्वेक्षण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून करण्यात आलेले या डिजिटल सर्वेक्षणाद्वारे मिळालेली माहिती ही भटक्या श्वानांच्या लसीकरणासाठी तसेच निर्बीजीकरणासाठी उपयोगी पडणार आहे. आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या हे सर्वेक्षण देशात प्रथमच एआय प्रणालीचा वापर करून पालिका हद्दीतील श्वानांची डिजिटल माहिती गोळा करण्यात आली आहे. या सर्वेक्षणाचा उपयोग रेबीज मुक्त पनवेलसाठी होणार असल्याचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले आहे. इंडिकेअर एआय सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या स्टार्ट अप कंपनीच्या माध्यमातून हे डिजिटल सर्वेक्षण करण्यात आले आहे. भारतात प्रथमच अशा प्रकारचा उपक्रम राबविले गेले आहे. या सर्वेक्षणात १९ हजार ३०७ भटके श्वान आणि ५ हजार ८० भटक्या मांजरीची नोंदणी केली आहे. भटक्या श्वानांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीचा उपयोग होणार आहे. भटक्या श्वानांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ही माहिती उपयोगी पडणार आहे. हे महत्वपुर्ण सर्वेक्षण वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. भगवान गीते व डॉ. मधुलिका लाड यांनी केले आहे.

या डिजीटल सर्वेक्षणातून मिळालेली माहितीचा वापर महापालिकेच्या पशु वैद्यकिय विभागाच्यावतीने भविष्यातील सूक्ष्म नियोजनासाठी करता येणार आहे. या सर्वेक्षणामुळे भटक्या श्वानाची नसबंदी झाली आहे की नाही हे कळणार आहे. या डिजिटल सर्वेक्षणात श्वान, मांजरीचा फोटो, जेंडर, वय, आरोग्याची स्थिती नमूद करण्यात आली आहे. एखाद्या व्यक्तीस भटका श्वान चावल्यास या सर्वेक्षणातील माहितीमुळे तो श्वान कोणत्या परिसरातील आहे याचा शोध घेणे सहज शक्य होणार आहे. महापालिकेने निर्बिजीकरणाचा कार्यक्रम 2018 पासून हाती घेतला असुन या सर्वेक्षणांतर्गत एकुण 44 टक्के भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून असे दिसून आले की प्रौढ श्वानांची संख्या 10 हजार 270 एवढी आहे. श्वान पिल्लांची संख्या सुमारे 1800 आहे. तसेच वयस्क श्वानांची संख्या 1 हजार 440 एवढी आहे. यावरून महापालिकेने हाती घेतलेला निर्बीजीकरण कार्यक्रमाचे यश दिसून येत आहे.
रेबीजचा प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने महापालिकेने केलेले सर्वेक्षण महत्वपूर्ण ठरणार आहे. तसेच भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी देखील या सर्वेक्षणाचा उपायोग होणार आहे.

# आमरण उपोषण

दैनिक युवक आधार
रुपेश राजे करंजाडे
प्रतिनिधी
पनवेल उरण चिखले ग्रामपंचायतचे माजी सरपंच नामदेव माया पाटील आणि ग्रामसेविका स्नेहा नंदकुमार मयेकर यांनी अवैध प्रकारे माती उत्खनन करून विक्री केल्याप्रकरणी अपहाराचा व फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावा. अशी उपोषणाला बसलेले सौ. दिपाली दत्तात्रेय तांडेल ( सरपंच ) श्री दत्तात्रेय विठ्ठल तांडेल ( समाजसेवक ) श्री रघुनाथ मारुती पाटील सदस्य ग्रामपंचायत चिखले. यांनी केली आहे. सदर उपोषण




१७ मार्च २०२५ पासून पंचायत समिती पनवेल मुख्य प्रवेशद्वाराच्या जवळ चालू आहे. आज ११ वा दिवस चालू आहे. या उपोषणाला स्थानिक लोकांचा व आजूबाजूच्या सर्व ग्रामस्थांचा तसेच चिखले ग्रामस्थ यांनी पाठिंबा दिला आहे. हा विषय महाराष्ट्र शासना पर्यंत पोहचावा अशी उपोषणकरते यांची मागणी आहे. सदर या आंदोलनाला शिवसेना पनवेल तालुका संपर्क प्रमुख श्री बाळाशेठ नाईक, शिवसेना करंजाडे वडघर विभाग प्रमुख श्री नाथाभाई भरवाड, शिवसेना उप तालुका प्रमुख पनवेल ग्रामीण श्री चंद्रकांत गुजर, शिवसेना करंजाडे शहर संघटक श्री स्वप्नील मोरे यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांना पाठिंबा दर्शविला.

# घर बांधण्याच्या कामाचा ठेका घेण्यावरून उफाळला गंभीरवाद ?

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)
पनवेल तालुक्यातील नानोशी गावात धक्कादायक घटना घडली आहे. येथे सुरु असलेल्या एका बांधकाम साईटवर बांधकाम ठेक्याच्या वादातून एकावर गंभीर हल्ला करण्यात आला. यावेळी झालेल्या गोळीबारात एका व्यक्तीने आपला जीव गमावला आहे. बाबू वाघमारे असे या व्यक्तीचे नाव आहे. गोळीबार करणाऱ्या काही संशयितांना पनवेल पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरु आहे. नानोशी येथे घर बांधण्याच्या कामाचा ठेका घेण्याचा वाद उफाळून आला. घर बांधण्याच्या साईटवर 45 वर्षीय बाबू वाघमारे हे मेस्त्री काम करत होते. त्यांच्याबरोबर असलेल्या एका कामगाराचा कामाच्या ठेक्यावरून वाद झाला. वाद विकोपाला जाऊन त्याने बाबू वाघमारे यांच्यावर गावठी कट्टा रोखून थेट गोळीबार केला. या गोळीबारात बाबू वाघमारे यांचा जीव गेला असल्याचे पोलीसांनी सांगितले. मात्र या आरोपींच्या हाती असे भयानक शस्त्रे लागतात कसे ? परिसरात अवैध अग्निशस्त्रांची राजरोस तस्करी पोलिसांच्या अपरोक्ष सुरु आहे का ? असे अनेक गंभीर सवाल या प्रकरणामुळे विचारले जात आहेत

# दीपक फर्टिलायझर्सकडून तळोजा एमआयडीसी परिसरातील ४१ गावांमध्ये आरोग्यसेवा

**पान १ वरून**कारण यामुळे वेळेवर आणि परवडणारे निदान व उपचार सहज मिळू शकतात. गावकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल

या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कुत्तरपाडा गावातील रहिवासी कैलास कचरू आदईकर यांनी आपला अनुभव सांगितला. "वर्षानुवर्षे आम्हाला प्राथमिक आरोग्यसेवेअभावी मोठा संघर्ष करावा लागत होता. पण दीपक फर्टिलायझर्सच्या फिरत्या दवाखान्यामुळे आता माझ्या कुटुंबाला गावातच नियमित तपासणी आणि औषधोपचार मिळतात. विशेषतः आमच्या गावातील वृद्धांसाठी ही सुविधा जीवनदायी ठरत आहे."तसेच पेंधर गावातील साबिरा नजीर ताज यांनी सांगितले कि, "मी दोन वर्षांपासून त्वचेच्या समस्येने त्रस्त होते. अनेक ठिकाणी उपचार करूनही काही फरक पडत नव्हता. पण फिरत्या दवाखान्यातील डॉक्टरांनी अचूक निदान करून योग्य औषधोपचार दिले. आता माझी समस्या पूर्णपणे बरी झाली आहे. दीपक फर्टिलायझर्स आणि इशान्या फाउंडेशनच्या सेवेसाठी मी त्यांची आभारी आहे." समाजकल्याणासाठी दीपक फर्टिलायझर्सचा पुढाकार दीपक फर्टिलायझर्सच्या कॉर्पोरेट गव्हर्नन्सचे अध्यक्ष नरेश कुमार पिनीसेट्टी म्हणाले की, "दुर्गम भागातही दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. आमच्या फिरत्या दवाखान्यांच्या माध्यमातून आम्ही केवळ तात्काळ आरोग्यसेवा पुरवत नाही, तर निरोगी भविष्य घडवण्यासाठी योगदान देत आहोत." दीपक फर्टिलायझर्सच्या समाजकल्याणासाठी असलेल्या दृढ वचनबद्धतेमुळे हजारो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल होत आहेत आणि वंचितांसाठी दर्जेदार आरोग्यसेवा प्रत्यक्षात उपलब्ध होत आहे.

# गोखले रोडवरील डबल पार्किंग अडथळा: शिवसेना स्टाईल ॲक्शन!

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी, राकेश रमेश पाटील
दिनांक 27 मार्च, गोखले रोड जवळील शुश्रुक्षा हॉस्पिटल ते पोर्तुगीज चर्च येथे CNG भरण्यासाठी डबल पार्किंग मध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर शिवसेना स्टाईलमध्ये थेट रस्त्यावर उतरून कारवाई
दादर BPCL पंपासमोर CNG भरणाऱ्या कॅब्सच्या गर्दीमुळे स्थानिक रहिवासी, आपत्कालीन सेवा वाहने व प्रवाशांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरं जावं लागत आहे. या अनागोंदी ला आळा घालण्यासाठी शिवसेनेचे माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी शिवसेना स्टाईलमध्ये थेट रस्त्यावर उतरून कारवाई केली!
वाहतूक कोंडीला जबाबदार CNG पंप प्रशासनावर धडक कारवाई केली.
अवाजवी गर्दी करणाऱ्या आणि नियम धाब्यावर बसवणाऱ्या कॅबचालकांना स्पष्ट इशारा दिला आणि सहकार्य न करणाऱ्या कॅबचालकांच्या गाड्यांची थेट टायर पंचर करण्यात आले.
शिवसेनेचा स्पष्ट संदेश...लोकांना त्रास देणारी कोणतीही व्यवस्था खपवून घेतली जाणार नाही!
आंदोलनात कुणाल वाडेकर , संतोष तेलवणे , अभिजीत राणे , अजय कुसूम , चेतन राणे , स्वनिल केळशीकर , संकेत पवार व इतर पदाधिकारी उपस्तिथ होते

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

द • ख • ल

# पाच लाख साठ हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : रूमसाठी पैसे घेऊन रूमचा ताबा दिला नाही आणि पाच लाख साठ हजार रुपये परत केले नाहीत. याप्रकरणी विनीत सोरटे (सत्यदिप सोसा. नेरे) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

श्रद्धा पाटकर ह्या देवद येथे राहत असून त्या सप्टेंबर 2021 मध्ये कपिल वास्तू बिल्डर्स मालक विनीत सोरटे यांना भेटल्या. विचुंबे येथील इमारतीतील रूमचा व्यवहार दहा लाख पन्नास हजार रुपये ठरला. त्यानुसार करारनामा बनवला आणि रूमचे रजिस्ट्रेशन करून देतो असे आश्वासन दिले. यावेळी त्यांनी सात लाख 50 हजार रुपये दिले. यावेळी रूमचे रजिस्ट्रेशन आणि रूमचा ताबा देण्याबाबत विचारले असता तुमचे काम करतो असे सांगून वेळ मारून नेली. त्यानंतर त्या प्रोजेक्टवर गेल्या असता सदरचा रूम हा तेथील शेतकऱ्यांच्या मालकीचा असून विनीत सोरटे याने तो रूम स्वतःचा सांगून त्यांना विक्री केला. पुन्हा रूमचे रजिस्ट्रेशन करून दे अन्यथा पैसे परत करा असे सांगितले असता त्यातील एक लाख 90 हजार रुपये परत केले आणि उर्वरित पाच लाख 60 हजार रुपये परत केले नाहीत.

=====================================

# शिवीगाळ करून हातातील चावीने केली मारहाण

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर
कळंबोली येथे गाडीची चावी परत देण्यास का सांगितली याचा विचारणा केल्याच्या रागातून शिवीगाळ करून हातातील चावीने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी आरोपी जयेश भगत (राहणार कळंबोली) यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अजय जयस्वाल याने 21 मार्च रोजी वाहन क्रमांक एम एच ०६ बीई 2949 हे कॅप्टन हॉटेल जवळील पार्किंग कळंबोली गाव येथे पार्क केली होती. तो वाहनाजवळ उभा असताना जयेश भगत तेथे आला. यावेळी सोमनाथ याने वाहन तू चालवू नको असे बोलून अजयकडे त्याच्या वाहनाची चावी मागितली. ती त्यांना परत केली. तेथे हजर असलेल्या जयेश याला तू सोमनाथ गायकवाड यांना गाडीची चावी परत देण्यास सांगितले का असे विचारले असता त्याने वादविवाद करायला सुरुवात केली आणि शिवीगाळ करून कानाखाली मारली. त्यानंतर हातातील चावीने डोक्याला मारहाण केली. यात दुखापत झाली आणि रक्त येऊ लागले. त्यानंतर जयेश भगत पळून गेला.

================================

# 65 हजार रुपयांची चोरी

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर
चोराने घरात प्रवेश करून घरातून 65 हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.

संदीप तांडेल हे नवीन पनवेल येथे राहत असून त्यांचे मूळ गाव पाले बुद्रुक आहे. 22 मार्च रोजी ते पाले बुद्रुक येथे गेले होते. त्यानंतर रात्री लॉक करून ते पनवेल येथे आले. 23 मार्च रोजी बंगल्याच्या दरवाज्याचे कडी कोयंडा तोडून घरामध्ये चोरी झाल्याचे समजले. यावेळी त्यांच्या घराचे कपाट उघडे दिसले. चोराने त्यांच्या रूम मधील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले 65 हजार रुपये चोरून नेले.

# साडेचार लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर
खांदा कॉलनी येथे चोराने घरात प्रवेश करून जवळपास साडेचार लाख रुपयांचे सोन्याचे दागिने घरफोडी करून नेले. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.

दैवशाला कसबे ह्या सेक्टर सात,खांदा कॉलनी येथे राहत असून 24 मार्च रोजी त्या कामावरून दीड वाजता दुपारी घरी आल्या. यावेळी लाकडी दरवाजाची कडी तुटलेली दिसली. त्यांनी घरात जाऊन पाहिले असता बेडरूम मधील कपाटाचे लॉक तोडलेले आणि सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांना कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने सापडून आले नाहीत. अनोळखी इसमाने घरात प्रवेश करून साडेचार लाख रुपयांचे दागिने चोरून नेले.

# जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये क्रीडा सह्याद्री च्या मुलच्या संघाला प्रथम पारितोषिक..

दैनिक युवक आधार
उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक
विनोद गायकवाड



निफाड : टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने सिनिअर टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी नाशिक येथील दत्ता मोगरे स्टेडियम येथे उत्साहात संपन्न झाली. त्यामध्ये निफाड येथील क्रीडा सह्याद्री मुलाच्या संघाला प्रथम पारितोषिक व मुलीच्या संघाला दुतिय क्रमांक मिळाल्याबद्दल निफाड तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे। या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी, महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशन विलास गिरी,महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महिला अध्यक्ष धनश्री गिरी, नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड, सहसचिव धनंजय लोखंडे, इत्यादी उपस्थित होते. नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाबद्दल नियम व माहिती सांगितली. क्रीडा सह्याद्री मुलींच्या संघामध्ये कर्णधार आराध्या सालमुठे,श्रध्दा मोगल,वेदिका कुशारे,अनुष्का कुशारे,स्वानंदी बिदे तनिष्का निकम,श्रेयसी माळी,कृतिका मोगल ,मोक्षदा जाधव,धनश्री पातळे, तसेच मुलांमध्ये दक्ष विनोद गायकवाड( कर्णधार)

सिद्धेश मेमाणे , नैतिक दायमा,नूतन शर्मा, रणवर गुप्ता, साई जाधव ,ऋषभ बागडे , ऋतुराज आंधळे,वेदांत शेजवळ,, रेहान खानराजे ,सक्षम गायकवाड ,यांनी जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळ करत संघाला प्रथम पारितोषिक मिळवून दिल्याबद्दल व क्रीडा सह्याद्रीची खेळाडू , तमन्ना तांबोळी व करुणा शिंदे ज्यांची नाशिक येथे होत असलेल्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल क्रीडा सह्याद्री फाउंडेशनच्या अध्यक्ष विलास गायकवाड, क्रीडा सह्याद्री सदस्य प्रतीक्षा कोतकर ,कीर्ती कोटकर, ,विजय घोटेकर ,लखन घडमाळे ,,विनोद गायकवाड यांनी सर्वांनी अभिनंदन केले ,,व क्रीडा प्रशिक्षक विलास गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

# तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे वतीने रमजान ईद निमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप

दैनिक युवक आधार
तळा वार्ताहर
तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे प्राथमिक विद्यामंदिर, गो म वेदक विद्यामंदिर आणि कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळाच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पहिली ते अकरावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना रमजान ईद निमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी, अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, वरचा मोहल्ला अध्यक्ष दिलावर खाचे, पट्टीवाला मोहल्ला अध्यक्ष मोहम्मद खान पठाण, प्राचार्य श्री दिलीप ढाकणे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री सचिन भाटे, शिक्षक प्रतिनिधी प्राध्यापक दयानेकर बी एन आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुस्लिम बंधू व भगिनींना गुलाब पुष्प देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे यांनी रमजान ईद का साजरा करण्याचे महत्व सांगून डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी असे आवाहन केले. या संस्थेत विविध धर्माचे विद्यार्थी शिक्षण घेत असून सर्वांना समान वागवले जात असल्याचे प्रतिपादन केले. शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे यांनी मुस्लिम धर्मातील विद्यार्थ्यांनी प्राध्यापक, वकील, डॉक्टर, इंजिनियर, पोलीस , सैनिक आदी क्षेत्रांत करिअर करून आपले आई बाबा, गाव व शाळेचे नाव रोशन करावे असे आवाहन केले व आपण सर्व एकच असून जात व धर्माच्या पलीकडे जाऊन एकमेकांना मदत व सहकार्य करूया असे प्रतिपादन केले. वरचा मोहल्ला अध्यक्ष दिलावर खाचे यांनी रमजान ईदच्या निमित्ताने या संस्थेत शैक्षणिक साहित्याचे वाटप हा स्तुत्य कार्यक्रम आयोजित केल्याने संस्थेचे पदाधिकारी व शिक्षकांना धन्यवाद दिले. संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी यांनी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे या गीताचा संदर्भ देत रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. प्राचार्य श्री दिलीप ढाकणे यांनी प्रत्येकानी आपापला धर्म पाळावा, कोणीही इतर धर्माचा तिरस्कार करू नये, सर्व धर्माचा आदर करावा व घराचा उंब्रहाटा ओलांडल्यानंतर आपला धर्म बाजूला ठेवून मनुष्य हाच धर्म पाळावा असे सांगितले. अरीफा गोठेकर या विद्यार्थिनीने तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या संकुलात सर्वधर्म समभावाचे कार्यक्रम आयोजित केले जातात म्हणून आम्ही या महाविद्यालयात शिक्षण घेत असल्याचे सांगितले.

## 3 वर्षीय मुलीची हत्या, आरोपी विरोधात गुन्हा दाखल

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

: देवीचा पाडा, तळोजा येथे राहणाऱ्या तीन वर्षीय मुलीचा मृतदेह घरात सुटकेसमध्ये सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. तळोजा पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे.

25 मार्च रोजी देवीचा पाडा, माऊली कृपा इमारतीमध्ये राहणारी हर्षीका अमरेश शर्मा या 3 वर्षीय मुलीचे अपहरण केल्याचा गुन्हा तळोजा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी या मुलीचा शोध सुरू केला. दरम्यान 27 मार्च रोजी या मुलीचा मृतदेह तळोजा पोलिसांना घरात सुटकेसमध्ये सापडून आला आहे. या मुलीची हत्या कोणी केली याप्रकरणी तळोजा पोलीस अधिक तपास करत आहेत



# कर्नाळा अभयारण्यातील चोरीचा डाव उधळला ; चोरांचे मुद्देमाल टाकून पलायन

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)
: मुंबई-गोवा महामार्गावर कर्नाळा पक्षी अभयारण्यात चोरीचा प्रकार रोखण्यास एका तरुणाला यश आले आहे. मात्र, चोर पळून जाण्यास यशस्वी झाले असून, त्यांनी चोरलेला मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. चोरीची ही घटना घडली आहे.

कर्नाळा पक्षी अभयारण्य हे पर्यटकांचे आकर्षण आहे. शिवाय येथील कर्नाळा किल्ला पाहायला पर्यटकांची कायमच गर्दी असते. मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल जवळ कर्नाळा अभयारण्य आहे. येथे प्राण्यांच्या संरक्षणासाठी लोखंडी पत्रे लावले आहेत. गुरुवारी पहाटे दोन-अडीचच्या




सुमारास अभयारण्यात हे पत्रे चोरून एका टेम्पोत ठेवण्यात आले. त्याचवेळी मुंबईहून पेणच्या दिशेने जाणार्या तरुणांच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यांनी गाडी थांबवली आणि एका तरुणाने पत्रे का चोरता असे विचारले. एवढेच नाही तर त्याने लगेचच पनवेल पोलिसांना मोबाईलवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. तरुणाने पोलिसांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरु केल्यानंतर आरोपींनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांच्यामध्ये बाचाबाची आणि झटापट झाली. पहाटेची वेळ असल्यामुळे अंधार होता. त्याचा फायदा घेत ते दोन-तीन चोर संरक्षण भिंतीवरून उडी मारून जंगलात पळून गेले. तोपर्यंत त्या तरुणांनी 100 नंबरवर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिल्यावर काही वेळातच निर्भया पथकाचे शिल्पा कवी आणि धनंजय पाठारे घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पोलिसांनी पहाटे साडेतीनच्या सुमारास लोखंडी पत्रे असलेला टेम्पो जप्त केला आहे

# सविता पाटोळे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार



दैनिक युवक आधार
उत्तर महाराष्ट्र विभागीय
संपादक विनोद गायकवाड

सिन्नर तालुक्यातील दोडी (खुर्द )ग्रामपंचायत मध्ये शासनाच्या विविध योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करून शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे राहणीमान उंचावून सर्वोत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ग्रामपंचायत अधिकारी सविता मीना अण्णासाहेब पाटोळे यांना आशीमा मित्तल(भा.से. प्र.),मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांच्या हस्ते आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सविता पाटोळे यांनी सन 2022- 23 या आर्थिक वर्षात पंधरावा वित्त आयोग, नळ कनेक्शन, पंतप्रधान घरकुल आवास योजना कामे, कर वसुली करणे व परिसर स्वच्छ करणे वृक्ष लागवड ईत्यादु कामे केली असून या कामांमुळे स्थानिक नागरिकांचे .जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे त्याच्या या कामाची दखल घेऊन जिल्हा परिषदेने आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे , खा. राजाभाऊ वाजे, दोडी (खुर्द) चे सरपंच रमेश आव्हाड, सर्व ग्रामपंचायत कार्यकारिणी तसेच ज्ञानेश्वर इलक, विष्णू साबळे व दोडी खुर्द गावातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे,

## कै बापूराव पाटील कदम करकाळेकर यांच्या स्मरणार्थ वासंतिक कथायन करकाला येथे संपन्न.

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी
चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर
नांदेड ग्रामीण भागात महाराष्ट्रातील असंख्य साहित्यिक करकाला गावात आले असता व्हीपीके उद्योग समूहचे अध्यक्ष श्री मारोतराव कवळे गुरूजी मार्गदर्शन करताना व उपस्थित जनसमुदाय तसेच सत्राचे अध्यक्ष प्रा डॉ. शंकर विभुते,प्रमुख पाहुणे श्री देवीदास फुलारी,प्रा. महेश मोरे आयोजक श्री दिगंबर कदम,सहभाग अनुपमा बन,रोहिणी पांडे,रूचिरा बेटकर,राम तरटे यांनी विविध आशयाच्या कथा कथन करून श्रोत्यांना कधी हसवून तर कधी रडवून सोडले.दोन तास कधी संपले कळलेच नाही. रघुनाथ पाटील कदम आनंद कदम,मल्लू कमळे,साहेबराव कदम,संतोष कदम,उत्तम कदम,व्यंकट पाटील,दिलीप सावंत वमहिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन श्री राम तरटे यांनी केले तर आभार श्री दिगंबर कदम यांनी मानले.




# कोकणात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा ; चक्रीवादळाचं संकट ?

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा
-----------
दिवसा उष्णता वाढत असली तरी रात्री आणि पहाटेच्या सुमारास हवेत गारवा निर्माण झाला आहे. याचं कारण म्हणजे सतत हवापालट होत आहे. याचा परिणाम आंबा, काजू, बागायतदार शेती, संत्री, सारख्या फळबागांवर होत असल्यानं शेतकऱ्याचं मोठं नुकसान होत आहे. दुसरीकडे सतत हवापालट होत असल्यानं शेतकरीच नाही तर सर्वसामान्य लोकांनाही याचा मोठा त्रास होत आहे.ही हवापालट होण्याचं मोठं कारण म्हणजे दक्षिणेकडे कमी दाबाचा पट्टा तयार झाला असून त्याचं रुपांतर चक्रीवादळात होण्याची शक्यता आहे. त्याचा मोठा फटका दक्षिणेतील राज्यांना बसत आहे. कर्नाटकात अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात हे चक्रीवादळ धडकणार नसलं तरी त्याचा परिणाम हवामानावर होणार आहे.दिवसभर चढणारे ऊन, घामाच्या धारा, वाढणारा उकाडा, संध्याकाळनंतर अचानक सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि हवेत गारवा निर्माण होतो. त्यानंतर पाऊस पडतो. अचानक पावसामुळे रात्री आणि पहाटे हवेत गारवा निर्माण होतो, मात्र नंतर उष्णता वाढते असं सध्या दुहेरी संकट आहे. एकीकडे वाढणारी उष्णता दुसरीकडे अवकाळी पाऊस यामध्ये शेतकऱ्याचं अतोनात नुकसान होत आहे. पुन्हा एकदा सायक्लोनिक सर्क्युलेशनसारखी स्थिती निर्माण झाली आहे. दक्षिणेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे कर्नाटक आणि महाराष्ट्रात हवापालट झाली असून मुसळधार पाऊस पडत आहे. हवामान विभागाने आता पुन्हा एकदा अलर्ट दिला आहे. त्याच वेळी दुसरीकडे दिवसा तीन ते चार डिग्री तापमान वाढ होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कोकणपट्ट्यात रायगड,रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा 29 आणि 30 मार्च रोजी देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत यावेळी कोरडं किंवा ढगाळ वातावरण राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुण्यात गारवा राहील, तर काही भागात पावसाच्या तुरळक सरी बरसतील. कोल्हापूर, घाटमाथ्यावर मात्र ढगांच्या गडगडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.घाटमाथ्यावर देखील 29 आणि 30 मार्च रोजी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे. सांगली, सोलापूरमध्येही पाऊस पडेल. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीडमध्ये हलक्या सरी बरसण्याची शक्यता आहे. या व्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्रात वातावरण कोरडं राहणार आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात मागच्या 24 तासात 38 ते 40 डिग्री तापमानाची नोंद अनेक जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे. तर पुढचे तीन दिवस तापमान वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.



# अपोलो नवी मुंबईने २०० रोबोटिक गुडघे रिप्लेसमेंटचा टप्पा पार केला

## अचूकता आणि देखभालीसह रुग्णांना त्यांची मोबिलिटी पुन्हा मिळवून दिली

दैनिक युवक आधार
संतोष आमले
नवी मुंबई, २७ मार्च २०२५ :अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने रोबोटिक गुडघे रिप्लेसमेंटच्या २०० सर्जरी यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. हे यश फक्त संख्येपुरते मर्यादित नाही तर २०० लोकांना या हॉस्पिटलने त्यांचे स्वातंत्र्य, मोबिलिटी आणि जीवन गुणवत्ता पुन्हा मिळवून दिली आहे. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई रुग्णांच्या देखभालीसाठी वचनबद्ध आहे. याठिकाणी अचूक प्रक्रिया करण्यासाठी प्रगत रोबोटिक तंत्रज्ञान आणि प्रसिद्ध सर्जन्सची नैपुण्ये यांची सांगड घातली जाते, त्यामुळे रुग्णांना वेगवान रिकव्हरी आणि दीर्घकालीन कल्याण यांचे लाभ मिळतात. २०० रोबोटिक गुडघा रिप्लेसमेंटचा टप्पा पार करणे हे अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईचे केवळ एक वैद्यकीय यश नाही तर त्यामुळे २०० व्यक्ती स्वतंत्रपणे चालू-फिरू शकत आहेत आणि अधिक चांगल्या जीवन गुणवत्तेचा आनंद घेत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, अतिशय कुशल क्लिनिशियन्स आणि सर्वसमावेशक रिहॅबिलिटेशन यांसह अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई ऑर्थोपेडिक उत्कृष्टतेची नवी व्याख्या रचत आहे. हॉस्पिटलमधील आधुनिक रोबोटिक प्रणाली, उच्च गुणवत्तापूर्ण युएसएफडीएने मंजूर केलेल्या प्रत्यारोपणामुळे सर्जरी अतुलनीय अचूकपणे केली जाते, रुग्णांना कमीतकमी असुविधा आणि जास्तीत जास्त मोबिलिटीचे लाभ मिळतात. आर्थोपेडिक तज्ञ, वेदना व्यवस्थापन तज्ञ आणि संसर्ग नियंत्रण प्रोफेशनल्सची तज्ञ टीम यांच्यासह अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई रुग्णांना आराम मिळवून देण्यास प्राथमिकता देते. त्यामुळे त्यांना अतिशय सुरळीतपणे उपचार करवून घेता येतात. हॉस्पिटलमध्ये प्रगत रिहॅबिलिटेशन सेंटर आहे जे रुग्णांना आत्मविश्वास आणि मोबिलिटी परत मिळवून देण्यात मदत करते, त्यामुळे त्यांना आपली रोजची कामे पुन्हा सुरु करण्यात मदत मिळते.

डॉ संजय धर, सिनियर कन्सल्टन्ट, आर्थोपेडिक्स-रोबोटिक सर्जरी,अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई यांनी सांगितले,"आमच्या प्रगत रोबोटिक प्रणालीमुळे आम्ही प्रत्येक रुग्णासाठी इम्प्लांट्सच्या अलाइनमेंट्स कस्टमाइज करू शकतो. आम्ही उच्च दर्जेदार, युएसएफडीएने मंजूर केलेल्या इम्प्लांट्सचा उपयोग करतो. अचूक सर्जिकल प्रक्रिया केल्या जात असल्याने सर्जरीनंतर रुग्णांना उत्कृष्ट मोबिलिटी अनुभव मिळतो, अनेक रुग्णांची हीच मोठी चिंता असते. आमचा सर्वसमावेशक देखभाल दृष्टिकोन रुग्णांना सर्जरीनंतर एकाच दिवसात चालण्या-फिरण्यासाठी सक्षम बनवतो." डॉ विक्रम पावडे, सिनियर कन्सल्टन्ट, आर्थोपेडिक्स आणि रोबोटिक सर्जरी, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाले,"मुंबईचे रहिवासी, ५५ वर्षे वयाचे श्री विलास रोकडे यांचे नुकतेच बाय-लॅटरल टीकेआर म्हणजेच दोन्ही गुडघ्यांचे इम्प्लांटेशन केले गेले आणि तरी देखील त्यांना जास्त वेदना झाल्या नाहीत, एकाच आठवड्यात घरी पाठवण्यात आले. ही केस अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये आमची देखभाल नैपुण्ये आणि मानके दर्शवते." डॉ प्रशांत अगरवाल, सिनियर कन्सल्टन्ट, आर्थोपेडिक्स-रोबोटिक सर्जरी, अपोलो हॉस्पिटल्स, नवी मुंबई यांनी सांगितले,"अनुभवी क्लिनिशियन्स, संसर्ग नियंत्रण आणि वेदना व्यवस्थापन टीम्स यामुळे अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये टीकेआर प्रक्रिया करवून घेणाऱ्या रुग्णांना उत्तम रिकव्हरीचे लाभ मिळतात. दुसऱ्या देशांमधून आमच्याकडे येणाऱ्या रुग्णांनी देखील सांगितले की, त्यांची खूप चांगली काळजी घेतली गेली आणि ते कोणताही त्रास न होता लवकर बरे झाले."

द • ख • ल

## सायबर गुन्हेगारांपासून सावध राहण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**प्रतिनिधी** -शिंगवे पारगाव प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पीएम किसान) अंतर्गत शेतकऱ्यांच्या मोबाइलवर झच् घळीरप श्रळींं. अझघ किंवा झच् घळीरप अझघची लिंक उघडताच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात असलेली रक्कम गायब होत आहे. तरी शेतकऱ्यांनी ही लिंक उघडू नये, असे आवाहन आंबेगाव तालुका कृषी अधिकारी सिध्देश ढवळे यांनी केले आहे. १५ जून २०२३ च्या शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री किसान. सन्मान निधी योजना कृषि विभागामार्फत राबविण्यात येत आहे. परंतु सायबर गुन्हेगार काही बोगस लिंक पाठवून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करीत आहेत. तरी शेतकरी बांधवांना कृषी विभाग यांच्या वतीने असे आवाहन करण्यात येत आहे की अशी कोणतीही पीएम कीसान लिंक ओपन करू नये.पीएम किसान एपीके लिंक उघडताच शेतकऱ्यांची बँक खाती रिकामी होत आहे. आणि अशी काही घटना घडल्यास किंवा आढळून आल्यास त्वरीत जवळच्या संबंधित सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवावी, अशा प्रकारचे जाहीर आवाहन आंबेगाव कृषी कार्यालयाकडून केले जात आहे.

## नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत अंशिकाचे यश

**कवठे येमाई** – शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील एक अग्रगण्य व नामांकित असलेली पुणे जिल्हा परिषदेच्या कवठे येमाई केंद्र शाळेतील इयत्ता ५ वि ची विद्यार्थिनी कुमारी अंशिका अशोक फसले हिने नुकत्याच झालेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादित केले असून ती जवाहर नवोदय विद्यालय येथे प्रवेश पात्र ठरली असल्याची माहिती शाळे चे केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक सखाराम फंड यांनी दिली.



कु.अंशिका अशोक फसले हिने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल तिचा आज गुरुवार दि. २७ रोजी जि. प .प्राथमिक शाळा कवठे यमाई येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यानिमित्ताने यशस्वी विद्यार्थिनी अंशिका फसले व मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती शिल्पा बाजीराव गावडे यांचा देखील शाळा व्यवस्थापन समिती,शाळेतील शिक्षक व पालक यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## चैत्र मासाच्या स्वागतासाठी सुगंधी दवण्याची शेती बहरली

**जेजुरी :** श्रीक्षेत्र जेजुरी परिसरातील दवणेमळा येथील शेतकऱ्यांनी लागवड केलेली दवण्याची शेती आता फुलोऱ्यात आली असून दवणा शेतामध्ये सर्वत्र पसरलेला सुगंध चैत्रमासाच्या आगमनाची चाहूल देत आहे. जेजुरीचा खंडोबा, कोल्हापूरचा ज्योतिबा, शिखर शिंगणापूरचे शंभू महादेव, लोणावळ्याची एकविरा देवी यांना दवणा वाहिला जातो. याशिवाय चैत्रातील यात्रा, उत्सवामध्ये दवणा लागतोच. जेजुरीपासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या दवणे मळा या ठिकाणी दवण्याचे उत्पादन घेतले जाते. दवणा ही वनस्पती अत्यंत नाजूक असते. याचा सुगंध खुप येतो.दवणा नावाचा पूर्वी शिवगण होता. त्याने बेलाप्रमाणे माझा स्वीकार व्हावा अशी भगवान शंकराकडे प्रार्थना केली, तेव्हा देवांनी त्याला तू सुगंधी वनस्पतीच्या रूपात जन्म घेशील तेव्हा मी तुला धारण करील असा वर दिला. त्यामुळे दवणा भगवान शंकराला फार प्रिय झाला. अशी आख्यायिका आहे.

# मॅचवर बेटिंग करणाऱ्या नगरसेवकाच्या पुतण्यासह तिघांना बेड्या

**पिंपरी- चिंचवड :** पिंपरीत क्रिकेट बुकिंवर पोलिसांची करडी नजर आहे. राजस्थान रॉयल्स विरुद्ध कोलकत्ता नाईट रायडर्स क्रिकेट सामन्यावर बेटिंग घेणाऱ्या तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. बेटिंग प्रकरणी माजी नगरसेवकाच्या पुतण्यासह तिघांना अटक केली आहे. पिंपरी पोलिसांनी दोन लाख पंचवीस हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



मयूर चंदर मेवानी, धीरज चंदर मेवानी आणि आकाश हरेश आहुजा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नाव आहे. ही कारवाई राजस्थान रॉयल्स विरुद्ध कोलकत्ता नाईट रायडर्स क्रिकेट सामन्यावर सट्टा घेत असताना छापा टाकून कारवाई करण्यात आली. पोलीस कर्मचारी विष्णू गौतम भारती यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करून घेण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी रिव्हर रोड येथे बंद खोलीत मयूर चंदर मेवानी, धीरज चंदर मेवानी आणि आकाश हरेश आहुजा हे आयपीएलच्या राजस्थान रॉयल्स विरुद्ध कोलकत्ता नाईट रायडर्स क्रिकेट सामन्यावर बेटिंग घेत असल्याची माहिती मिळाली होती. आरोपी हे क्रिकेट लाईन गुरू ॲप वरून बेटिंग घेत होते. पिंपरी पोलिसांनी छापा मारून तिघांना ताब्यात घेऊन अटक केले आहे. आरोपीकडून दोन लाख पंचवीस हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात पाच मोबाईल आणि रोख रकमेचा समावेश आहे. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४, ५, १२ (अ) भारतीय टेलिग्राफ ॲक्ट कलम २५ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दिगंबर अतिग्रे करत आहेत.

## वाहनांना लागणारी आग रोखण्यासाठी 'आरटीओ'ची मोहीम

**पुणे :** वाढते तापमान आणि यामुळे धावत्या वाहनांना अचनाक लागणारी आग, या पार्श्वभूमीवर सुरक्षात्मक उपाययोजनांसर्दभात उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे (आरटीओ) व्यावसायिक वाहनांची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. वाहनांमध्ये सुरक्षात्मक उपाययोजना आणि इतर सरकारच्या आदेशाचे पालन होत आहे किंवा नाही, याची पडताळणी करण्यात येणार आहे. यामध्ये विशेषत: शालेय वाहनांपासून ते कंपन्यांच्या वापरासाठी लागणारी खासगी आणि अंतर्गत वाहने तसेच रिक्षा आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा समावेश असणार आहे.

हिंजवडी येथील एका कंपनीच्या वाहनाला आग लागल्याने चार व्यक्तींचा होरपळून मृत्यू घटला. ही घटना हेतुपूरस्सर असली, तरी संबंधित वाहनामध्ये आपत्कालीन परिस्थितीचा अभाव किंवा स्व संरक्षणासाठी वाहक-चालकाकडून प्रवाशांना पूर्वकल्पना देण्यात येते किंवा नाही, याचा पूर्णपणे अभाव असल्याचे प्राधमिकदृष्टा समोर आले आहे. तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या वाहनांमध्ये देखील सुरक्षात्कम उपरणांचा अभाव असल्याच्या तक्रारी होत असतात. त्यातच दरवर्षी उन्हाळ्यामध्ये अशा वाहनांना आग लागण्याचे प्रकार जास्त घडत असतात. त्यापार्श्वभूमीवर कागदपत्रांची पूर्तता असली, तरी परिवहन विभागाच्या निर्देशाप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी होत आहे किंवा नाही हे देखील तिककेच महत्वाचे आहे. त्या पार्श्वभूमीवर उपायोजनांच्या अनुषंगाने 'आरटीओ' प्रशासनाकडून तपासणी मोहीम हाती घेतली असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

## मोरडेवाडी येथे लावलेल्या पिंजऱ्यात बिबट मादी जेरबंद

**निरगुडसर :** मंचर ता. आंबेगाव येथील मोरडेवाडी येथे गेल्या काही दिवसापासून धुमाकूळ घालणारी बिबट मादी आज पहाटे पिंजऱ्यात जेरबंद झाली असल्याची माहिती वनविभागाची वनपाल संभाजी गायकवाड यांनी दिली. मोरडेवाडी ता. आंबेगाव येथे स्थानिक शेतकऱ्यांना, नागरिकांना बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण होते. चार , पाच दिवसापूर्वी शेतात काम



करत असताना मक्याच्या शेतात लपलेल्या बिबट्याने मोरडेवाडी येथील सिंधुबाई मोरडे या महिलेवर चाल करत हल्ल्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. बिबट्याला पकडण्यासाठी स्थानिक नागरिकांनी केली होती. वन विभागाचे अधिकारी रेस्क्यू टीम यांनी मोरडेवाडी परिसरात बिबट्याने दर्शन दिलेले मराठी शाळेच्या पूर्व व पश्चिम बाजूला दोन पिंजरे लावले लावले होते व त्यात भक्ष्य देखील ठेवले होते आज पहाटे धनेश मोरडे यांच्या शेतात लावलेल्या पिंजऱ्यात बिबट मादी जेरबंद झाली आहे. गेल्या अनेक दिवसापासून नागरिकांना दर्शन देणारी बिबट मादी पिंजऱ्यात जेरबंद झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

## जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत 'अष्टनायिका सन्मान सोहळा'




**वाघोली :** विश्वभरारी फाउंडेशनच्या सोहळ्याचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने प्रमुख अतिथींच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विलेपार्ले विधानसभेचे आमदार पराग अळवणी, ज्येष्ठ अभिनेत्री ईला भाटे व प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक सचिन गुंजाळ उपस्थित होते. यावर्षी विश्वभरारी फाउंडेशनने, महिला उद्योजिका हा विषय हाताळून, विविध क्षेत्रातील महिला उद्योजकांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करविला. सदर कार्यक्रमात श्वेता इनामदार, सायली वेलणकर, मुद्रा रेडकर, साक्षी गुंजाळ, दीपिका चाळके, प्राजक्ता चावरे, सुनीता घायतडक व साधना वझे या आठ महिला उद्योजकांचा अष्टनायिका शीर्षकाने सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात शाल्मली बर्वे व आशा पाटील यांचा देखील विशेष सन्मान करण्यात आला. पराग अळवणी, ईला भाटे आणि सचिन गुंजाळ, यांनी आपल्या छोटेखानी भाषणात, विश्वभरारी फाउंडेशनच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. संस्थेचे सचिव प्रकाश राणे यांनी प्रास्ताविक सादर केल्यानंतर, अध्यक्षा लता गुठे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पदलालित्य हा अभिनव नृत्याविष्कार, लीना लळीत यांनी व त्यांच्या शिष्यांनी सादर केला. हा कार्यक्रम विशेष दाद मिळवून गेला. सदर सोहळा आयोजित करण्यात लीना रेडकर, चारुलता काळे, स्वाती पोळ, निशा वर्तक, पूजा राईलकर व इतर कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम करून, हा कार्यक्रम यशस्वी पार पाडला. संस्थेचे पदाधिकारी चंद्रकांत बर्वे, प्रशांत राऊत, अशोक शिंदे, डॉ. संपदा पाटगावकर आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ अरविंद प्रभू यांचे कार्यक्रमाला मोलाचे सहकार्य लाभले. सन्मानित अष्टविनायकांच्या वतीने सायली वेलणकर यांनी सन्मानाला उत्तर दिले. विना भागवत, मेधा शेटे डॉ. कविता रेगे सुप्रसिद्ध नृत्यांगना तेजस्विनी लेले, गौरी जोशी विविध क्षेत्रातील इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा घायतडक यांनी केले. पूजा राईलकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# महाराष्ट्रातील सेवानिवृत्त पोलिसांना न्यायालयाचा दिलासा

**आळंदी :** महाराष्ट्र राज्यातील एकूण १,७२४ सेवानिवृत्त पोलिस कर्मचाऱ्यांनी दहा-वीस-तीस अंतर्गत एस-१४ वेतनश्रेणी मिळावी यासाठी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. पोलीस महासंचालकयांनी ऑगस्ट २०२४ रोजी गृह विभागाला पाठवलेल्या प्रस्तावावर तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा आणि याचिकाकर्त्यांना १ जानेवारी २०१६ पासून वेतनवाढीचे फायदे शासन निर्णयाचे शासन आदेशानुसार देण्याची शिफारस करावी असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. शासनाने सकारात्मक निर्णय घेतल्यास, थकीत रकमेची गणना करून नवीन वेतन निश्चितीची कार्यवाही त्वरित करावी. या निर्णयामुळे सेवानिवृत्त पोलिस कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला असून, त्यांच्या वेतनातील तफावत दूर होण्याची आशा निर्माण झाली आहे. संपत महादेव जाधव आणि विनायक महादेव खंदारे यांनी केलेल्या या याचिकांवर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे आणि अश्विन डी.भोबे यांनी हा निर्णय दिला, अशी माहिती संपत जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सदाशिव भगत, हणुमंत घाडगे, कैलास गिरी, कैलास लांडे, शरद बोंगाळे तसेच संस्थेचे सभासद व पदाधिकारी उपस्थित होते. पोलिस नाईक पद रद्द केलेने पोलीस नाईक आणि पोलीस हवालदार यांच्या मूळ वेतन स्तरात फक्त १०० रुपयांच्या ग्रेड पे फरकामुळे झालेल्या अन्यायाचे निराकरण होण्याची आशा निर्माण झाली आहे. संपत जाधव म्हणाले, न्यायालयाच्या आदेशानुसार, ९० दिवसांच्या आत निर्णय घेणे आवश्यक आहे. मुख्य गृह सचिवांनी आदेशांच्या पालनार्थ त्वरित कार्यवाही करावी, यासाठी संपत जाधव यांनी सर्व संबंधितांना लेखी पत्रव्यवहार केला आहे आणि सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे केव्हेटही दाखल केली आहे. सध्याच्या अधिवेशनानंतर, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वित्तमंत्री अजित पवार हे उच्च न्यायालयाच्या निर्णयांचे पालनार्थ लवकरात लवकर आदेश पारित करतील अशी आशा आहे. जर १५ दिवसांच्या आत आदेश निर्गमित झाले नाहीत, तर मुख्य गृह सचिवांना नोटीस देऊन उच्च न्यायालय, मुंबई येथे अवमान याचिका दाखल केली




जाईल. सदर आदेशाच्या पालनार्थ वित्त सचिवांकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे आणि लवकरच कार्यवाही होईल. त्यामुळे, न्यायालयाने ६ मार्च २०२५ रोजीच्या ६९३ याचिकाकर्त्यांच्या याचिकेतही ९ डिसेंबर २०२४ च्या आदेशाप्रमाणेच निर्णय दिला आहे, ज्यामध्ये १ जानेवारी २०१६ पासून लाभ देण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. २५ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयानुसार, नाईक पद भूतलक्षी प्रभावाने रद्द करून, सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० आणि ३० वर्षांच्या सेवेनुसार अनुक्रमे पोलीस हवालदार, सहाय्यक पोलीस फौजदार आणि पोलीस उपनिरीक्षक पदांची एस-१४ वेतनश्रेणी देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे पदोन्नतीचा मार्ग मोकळा होऊन वेतनातील तफावत दूर होईल.

# न्यायालयातील खटल्यांची संख्या घटविण्यास तंटामुक्त गावांतील सुत्र उपयोगी

युवक आधार
*निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी* *शिंगवे गावास दहा वर्षापुर्वी तंटामुक्त गावाचा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला हे वाखणण्याजोगे आहे गावपातळीवर तंटे मिटविण्याचे येथील ग्रामस्थांचे सुत्र खरे तर गाव पंचांनी इतर गावांत जाऊन वाटावे जेणेकरुन न्यायालयीन खटल्यांची संख्या घटण्यास मदत होईल असे प्रतिपादन नाशिकचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी यांनी केले*

निफाड तालुक्यातील शिंगवे येथे आयोजित कायदेविषयक शिबीर व शासकीय योजनांचा मेळा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते

नाशिक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ,निफाड वकिल संघ ,शिंगवे ग्रामपंचायतीकतर्फे आयोजित कार्यक्रमप्रसंगी मंचावर निफाडचे जिल्हा सत्र न्यायाधीश अजय गुजराथी, निफाडचे जिल्हा सत्र न्यायाधीश बाळासाहेब पवार ,विधी सेवा समितीचे सचिव मिलिंद बुराडे उपविभागीय पोलिस अधिकारी डाँ निलेश पालवे, तहसिलदार विशाल नाईकवाडे, गटविकास अधिकारी तुकाराम जाधव ,नाशिक जिल्हा अँड फेडरेशनचे अध्यक्ष अँड इंद्रभान रायते, वकिल संघाचे अध्यक्ष अँड प्रविण ठाकरे ,शिंगवेचे उपसरपंच संप्रदा शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते

स्वागतगीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले विविध शासकिय योजनांच्या दालनाचे न्या जगमलानी यांचे हस्ते फित कापुन उदघाटन करण्यात आले. दिपप्रजवलनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला
प्रस्ताविकातुन निफाडचे जिल्हा सत्र न्यायाधीश अजय गुजराथी यांनी देशभरातील न्यायालयीन खटल्यांची संख्या वाढत आहे गावातील तंटे गावातच मिटले पाहिजेत शिवाय कायदेविषयक प्रबोधनातुन समाजाला जागृत करणेसाठी अशा शिबीराचे आयोजन करण्यात आल्याचे स्पष्ट केले

याप्रसंगी मंचावरील मान्यवरांचा
शाल फेटा व वृक्षाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमास उपस्थित निफाडचे जिल्हा सत्र न्यायाधीश अमर काळे,दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आरती सराफ,न्यायाधीश जितेंद्रकुमार भेंडे,न्यायाधीश नरेंद्र जोशी,न्यायाधीश राहुल पुरोहित,प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी स्नेहा देशपांडे, न्यायदंडाधिकारी एस एस सुक्रे, सायखेड्याचे सपोनि विकास ढोकरे, डाँ एम एस तांभाळे, विज वितरणच्या विधी अधिकारी नंदा महाले,तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांचा स्थानिक ग्रामस्थांचे वतीने सत्कार करण्यात आला महिलांविषयक कायदे व त्यातील तरतुदी या विषयावर निफाडच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी स्नेहा देशपांडे यांनी मार्गदर्शन केले ,विधी सेवा समितीचे सचिव मिलिंद बुराडे यांनी विधी सेवा समितीचे कामकाजाबाबत मार्गदर्शन केले अँड इंद्रभान रायते यांनी शेतजमीनविषयक कायदे यावर मार्गदर्शन केले,वकिल संघाचे अध्यक्ष अँड प्रविण ठाकरे यांनी मनोगतातुन कार्यक्रमाचा उद्देश विषद केला याप्रसंगी




वकिल संघाचे उपाध्यक्ष अँड रामनाथ सानप,खजिनदार अँड केशवराव शिंदे, सचिव अँड रामनाथ शिंदे, सदस्य अँड सुनील शेजवळ,अँड अमोल शिंदे ,अँड विजय मोगल,अँड शरद नवले,अँड समीर भोसले,न्यायालयाचे कार्यालयीन अधिक्षक किशोर जावरे,सचिन गडकरी, अभिजित कुलकर्णी आदींसह

शिंगवे येथील ग्रामपंचायत व सोसायटी पदाधिकारी व स्थानिक विविध बचत गटाच्या महिला उपस्थित होते सुत्रसंचालन अँड रामनाथ शिंदे यांनी केले तर आभार अँड अमोल शिंदे यांनी मानले

फोटो च्या खालचे कॅप्शन

शिंगवे ता निफाड येथे विधी साक्षरता शिबीराचे उदघाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी समवेत निफाडचे जिल्हा व सत्र न्यायाधीश ए व्ही गुजराथी, वकिल संघाचे अध्यक्ष अँड प्रविण ठाकरे आदी

## बुध्दगया मंदिर कायदा बिहार सरकारने रद्द करुन महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे

दैनिक युवक आधार सहसंपादक
मुकुंद कांबळे
रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणीत महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याचा ठराव मंजुर - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले नवीदिल्ली/ मुंबई दि.27 - बुध्दगया मंदिर कायदा 1949 बिहार सरकारने रद्द करुन महाबोधी महाविहार संपूर्णपणे बौध्दांच्या ताब्यात द्यावे असा ठराव रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणी बैठकीत मंजुर करण्यात आला अशी माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज दिली. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा आहे.महाबोधी महाविहार बौध्दांच्या ताब्यात मिळविण्याचा ना.रामदास आठवले यांनी निर्धार केला असुन त्यासाठी दि.28 मार्च पासुन 3 दिवस ना.रामदास आठवले बुध्दगयेत ठाण मांडणार आहेत.बुध्दगया मंदिर कायदा रद्द करण्यासाठी निर्धाराने प्रयत्न करणार असल्याबद्दल ना.आठवले यांच्या पाठिशी संपूर्ण देशभरातील रिपब्लिकन पक्ष खंबीरपणे उभा असल्याचे सांगत त्यांच्या बुध्दगया दौऱ्याला यश लाभो अशा शुभेच्छा रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीत ना.रामदास आठवले यांना देण्यात आल्या. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेत नवी दिल्ली येथे झालेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीत देशभरातील रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख नेते आणि राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. देशभरात येत्या वर्षभरात रिपब्लिकन पक्षाचे एक कोटी सदस्य जोडावेत आणि रिपब्लिकन पक्षाच्या तालुका; जिल्हा ;राज्य सर्व कार्यकारणी मध्ये दलित आदिवासी सोबत,ओबीसी,अल्पसंख्याक आणि सवर्ण जातसमुहांच्या कार्यकर्त्यांचा समावेश करावा. रिपब्लिकन पक्ष हा सर्व जातीधर्मीयांचा पक्ष आहे असा संदेश समाजात पोहोचवण्यासाठी सर्व जातीधर्मांना रिपब्लिकन पक्षाशी जोडण्याचे निर्देश ना.रामदास आठवले यांनी या बैठकीत दिले. दलित आदिवासी आणि ओबीसीना खाजगी क्षेत्रात शिक्षण आणि नोकरीत आरक्षण लागू करावेत असा महत्वाचा ठराव या बैठकीत मंजुर करण्यात आला अशी माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली आहे.






## उदगीर येथील तहसीलदाराचे नवीन उपक्रम

### तहसीलदार राम बोरगावकर यांच्या संकल्पनेतून संविधान जनजागृती

दैनिक युवक आधार
उदगीर - प्रतिनिधी
बालाजी तेलंग लातूर (उदगीर): भारतीय संविधान दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तहसीलदार राम बोरगावकर यांच्या संकल्पनेतून 'जागर संविधानाचा' या उपक्रमाअंतर्गत शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या प्रतींचे वितरण करण्यात येणार आहे. रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानच्या माध्यमातून हा महत्त्वाचा उपक्रम राबविला जात असून, संविधान जागरुकतेसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात येणार आहे. संविधानाबद्दल विद्याव्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, त्यांना संविधानाचे ज्ञान व माहिती मिळावी, तसेच प्रत्येक शाळेत संविधानाची प्रत असावी, यासाठी तहसीलदार राम बोरगावकर यांच्या पुढाकाराने हा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. संविधान जागरूकतेसाठी व्यापक उपक्रमांचे आयोजन संविधान दिनाच्या अमृतमहोत्सव 'तहसीलदार राम बोरगावकर यांनी रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना संविधान प्रत सुपूर्द करताना घेतलेला स्मरणीय क्षण.' 'संविधान जागरूकता' उपक्रमासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक संविधान जागरूकता अभियान यशस्वी करण्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे पुढील पिडी संविधानाचे महत्व समजून घेईल आणि लोकशाही मूल्यांची जपणूक होईल. हा उपक्रम केवळ शाळांपुरता मर्यादित न ठेवता, संपूर्ण समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन आणि प्रतिष्ठान प्रयत्नशील राहील. महोत्सवी वर्षानिमित्त हा उपक्रम केवळ पुस्तक वाटपापुरता मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. शाळा व महाविद्यालयामध्ये संविधान जागरूकता अभियान अंतर्गत खालील उपक्रम राबवले जातील:

# यवतमाळच्या आरोग्यसेवेला गंज – हॉस्पिटल परिसर अस्वच्छतेच्या गर्तेत! जबाबदार कोण?




दैनिक युवक आधार
यवतमाळ प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे
यवतमाळ (दि.27 मार्च): शहराच्या मध्यवर्ती भागातील टिळकवाडी-बापट चौक परिसर हा आरोग्यसेवेचा मुख्य केंद्रबिंदू आहे. येथे अनेक हॉस्पिटल्स,मेडिकल स्टोअर्स,डायग्नोस्टिक लॅब्स,सोनोग्राफी सेंटर आणि आयसीयू युनिट्स कार्यरत आहेत.हजारो रुग्ण उपचारासाठी येथे येतात.मात्र,या भागातील अस्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून,तो रुग्णांसाठीच नव्हे,तर संपूर्ण शहरवासीयांसाठी धोकादायक ठरत आहे! मेडिकल वेस्टेज थेट रस्त्यावर – कोण घेणार जबाबदारी? हॉस्पिटल आणि क्लिनिकचा बायोमेडिकल वेस्ट प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरून रस्त्यावर फेकला जात आहे.परिसरात दुर्गंधी,घाणीचे ढीग आणि डासांचा प्रादुर्भाव वाढत असून,त्यामुळे संसर्गजन्य आजारांचा फैलाव होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

अग्निसुरक्षा धोक्यात – पार्किंगच्या समस्येने वाहतूक ठप्प! हॉस्पिटल वेस्टेज जाळण्याचे प्रकार सुरू असून,उन्हाळ्यात अशा घटनांमुळे मोठा अनर्थ होऊ शकतो.नियोजित पार्किंग सुविधेचा अभाव असल्याने वाहतूक कोंडी होते.रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना वाहन उभे करण्यासाठी जागा मिळत नाही.हॉस्पिटल प्रशासन आणि नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे हा प्रश्न दिवसेंदिवस बळावत आहे.

नगरपरिषद आणि प्रशासन कोणती कारवाई करणार? या परिस्थितीला जबाबदार असलेल्या हॉस्पिटल मालकांवर कठोर कारवाई होणार का? नगरपालिका आणि प्रशासन यावर तातडीने उपाययोजना करणार का? परिसराची स्वच्छता कधी होईल आणि पर्यावरणीय समतोल कधी राखला जाईल?

प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी! हॉस्पिटल प्रशासनाने वैद्यकीय कचऱ्याचे योग्य प्रकारे निस्तारण करणे आवश्यक आहे.नगरपालिकेने कठोर उपाययोजना राबवून दोषींवर कारवाई करावी. नागरिकांनीही सजग राहून



प्रशासनावर दबाव टाकला पाहिजे.
युवक काँग्रेसने घेतला पुढाकार – प्रशासनाला ठोस इशारा! यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेसने या गंभीर परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत प्रशासनाला तातडीने कारवाई करण्याची कडक मागणी केली आहे.युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे यांनी संताप व्यक्त करत म्हटले की,"हॉस्पिटल परिसरातील अस्वच्छता आणि मेडिकल वेस्टेजमुळे रुग्णांचे आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. केवळ प्रशासनच नव्हे,तर हॉस्पिटल मालक,संचालक,तसेच मेडिकल आणि डायग्नोस्टिक सेंटरचे मालकही यासाठी तितकेच जबाबदार आहेत.वैद्यकीय व्यवसायाचा हेतू केवळ नफा कमावणे नसून,समाजाचे आरोग्य जपणे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे.जर त्यांनी स्वतःहून परिसराची स्वच्छता राखण्यास प्राधान्य दिले नाही आणि प्रशासनाने दोषींवर कठोर कारवाई केली नाही, तर युवक काँग्रेस रस्त्यावर उतरेल! हा केवळ इशारा नाही, तर जनतेच्या आरोग्यासाठी लढण्याची आमची कटिबद्धता आहे. प्रशासन आणि जबाबदार व्यक्तींनी आता निद्रिस्त राहू नये, अन्यथा जनता आम्हाला सोबत घेऊन आवाज उठवेल!"

## बोनी एन्टरटेन्मेंट आणि सोनल खानोलकर आयोजित वुमेन्स डे क्रिकेट टुर्नामेंटमध्ये ईपीआरचा सहभाग

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

वुमेन्स डे क्रिकेट टुर्नामेंट नुकताच साजरा करण्यात आला. बोनी एन्टरटेन्मेंट आणि सोनल खानोलकर आयोजित सुंदर आणि अविस्मरणीय असा हा सोहळा पार पडला.

ज्या मध्ये अनेको दिग्गज आले होते. राजकीय क्षेत्रामधील केदार दिघे यांनी या प्रसंगी स्वतः उपस्थीती नोंदवत उद्घाटन केले आणि स्त्री शक्ती बाबत मनोगत व्यक्त केले. त्याच बरोबरीने अपर्णा शहा संस्थापित अभियान ईपीआर टीमच्या कार्यरत राजदूतानी हजेरी लावली आणि हा जनजागृतीचा संदेश पोहचवला. ज्या प्रकारे आज आपण एक दिवस हा खेळण्याचा आनंद घेत आहोत, हा आनंद आपण चिरंतर टिकवू शकतो, हे ईपीआरच्या माध्यमातुन लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी टीम यशस्वी ठरली. त्याचप्रमाणे सर्व शारीरिक आणि मानसिकरित्या अजून प्रगल्भ विचार आचार करणे अत्यंत गरजेचे आहे. खाणे, खेळणे, वाचणे हे जीवनात किती महत्वाचे आहे हे उपस्थित जनसमुदायास आणि प्राप्तस्थळी उपस्थित प्रेक्षक यामध्ये हा जनजागृतीचा आवाज पोहोचवण्यास ईपीआर टीमला यश आले.




## लिहा-खेडी येथे नारी शक्ती गौरव सोहळा कार्यक्रम संपन्न महीलांनी मुलींकडे लक्ष केंद्रित करून संस्कार घडविण्याची गरज - सपोनि आरती जाधव

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर
सिल्लोड :- महिलांनी मैत्री प्रमाणेच वागावे म्हणजे ती, तुमच्या शी मन मोकळे पणाने वागेल, मुलींवर लहान पणी योग्य संस्कार करण्याची जबाबदारी आईची असते,याची जाणीव महिलांनी ठेवले पाहिजे,असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील दामिनी पथकाच्या प्रमुख तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव यांनी लिहाखेडी येथे बोलताना केले. लिहाखेडी (ता.सिल्लोड ) येथील महर्षी वाल्मिकी आदिवासी व विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त "नारी शक्ती" गौरव सोहळा व महीला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या सौ. शिल्पाताई अशोकराव गरुड यांच्या हस्ते झाले.तर मार्गदर्शक म्हणून सपोनि आरती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. सरपंच सौ. अनिताताई नामदेवराव साखळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास तज्ञ शिक्षिका एम.के.पाटील, माजी पंचायत समिती सदस्या सौ.वृषाली सुनील मिरकर, आयोजक तथा भाजप महिला आघाडीच्या तालुका सरचिटणीस सौ.सुभद्रा गजानन जाधव, खेडी च्या सरपंच सौ.वनिता डापके,सौ. मिनाक्षी कळात्रे, भाग्यश्री चव्हाण, मनिषा साळवी, जयश्री काळे, पुष्पा बडोदे, पोलीस पाटील रेखा मकवाने, शारदा काळे, वंदना चव्हाण नंदा काकडे, जेष्ठ समाजसेविका रुख्मनबाई सावळे, अनिता वाकडे, अनिता बनसोडे, आशा ठाकुर, सुवर्णा पालोदकर, यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या वेळी पुढे मार्गदर्शन करतांना सपोनि आरती जाधव म्हणाल्या की, महीला जर मुली सोबत मैत्री प्रमाणेच वागले तर समाज मध्ये वावरताना मुलींना जो त्रास होतो, तो ती तुम्हाला सांगेन अनुसूचित प्रकार घडतात ते अनुसूचित प्रकार रोखतो येईल. आधुनिक तंत्रज्ञानाचे युग असुन त्या मुळे मोबाईल चा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, हे साधने जेवढे उपयोगी तेवढं दुष्परिणामकारक सुद्धा आहे.मुलगी मोबाईल चा वापर कशाप्रकारे करते हे ही आईने बघणे गरजेचे आहे, अल्प वयात मुली चुकीचे निर्णय घेतात, नंतर वेळ निघून जाते , आणि नंतर पश्चात्ताप शिवाय पर्याय नसतो, कुठे काही महिलांना, समाजात अथवा सासर सह अन्य ठिकाणी छळ होत असेल तर बिनधास्त पणे पोलिसात तक्रार करावी असे आवाहन त्यांनी केले .असा चांगल्या प्रकारे




महिलांचा कार्यक्रम आयोजित केल्या बद्दल आयोजकांचे आरती जाधव यांनी अभिनंदन केले. या वेळी रुख्मनबाई अशोक साखळे, कडुबाई कृष्णा साखळे, पुष्पाताई हरीदास साखळे, राधा गणेश बावस्कर , कविता सुनील सांखळे, कविता कृष्णा फरकाडे, उषाताई सपकाळ,भाग्यश्री चव्हाण, रंजना कळात्रे , आशा बावस्कर,प्रयागताई साखळे, उषाताई सपकाळ,शोभा सपकाळ, ज्योती आरक, कविता काळे,कांताबाई सपकाळ, सुमनबाई सपकाळ, वंदना सपकाळ, केशरबाई सपकाळ, सौ.वाय.ई.सपकाळ, कार्यक्रम यशस्वीतेसाठी साठी मुख्याध्यापक नामदेवराव साखळे,हरीदास साखळे, कृष्णा साखळे, गणेश बावस्कर,अंबादास सपकाळ, बाजीराव डापके, गजानन जाधव,कृष्णा फरकाडे, ग्रामसेवक दिनेश राठोड,मुख्याध्यापक आर .एस. पाल्हाळ,जी.पी.सावळे, के.एस.काळे, शेषराव सपकाळ,शिवाजी सपकाळ, कृष्णा सपकाळ,विलास लाठे, दिलीप सपकाळ, आर काकडे,निखिल जाधव, हिम्मत मकवाने, अनिल मुळे,वाया.एस.दनके, या सह यशवंत आश्रम शाळा, ज्ञानसागर इंग्लिश स्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,मुर्डेश्वर विद्यालयाचे शिक्षिका विद्यार्थीनींनी, विद्यार्थ्यी परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## नैना क्षेत्रातील खरेदी विक्री रजिस्ट्रेशन सुरू करण्या साठी सकारात्मक चर्चा

### आमदार विकांत पाटील याचा पाठपुरावा

दैनिक युवक आधार
खांदा कॉलनी प्रतिनिधी
पनवेल नैना प्रभावित क्षेत्रातील बांधकामांमधील घरांचे बंद असलेले खरेदी विक्री रजिस्ट्रेशन सुरु करण्यासंदर्भात मार्ग निघावा यासाठी अधिवेशन काळात एक तातडीची विशेष बैठक आयोजित करण्याची मागणी आ. विक्रांत पाटील यांनी केली होती, त्यानुसार राज्याचे महसूल मंत्री सन्मा चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात या संदर्भात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.
गेले काही महिन्यांपासून बंद असलेले खरेदी विक्री रेजिस्ट्रेशन
हा शेतकरी व नागरिकांचा जिव्हाळ्याचा विषय असल्याने ते त्वरित सुरु करणे संदर्भात मागणी आ. विक्रांत पाटील यांनी केली. या विषयात ठोस धोरण कसे तयार करता येईल या विषयी



सकारात्मक चर्चा या बैठकीत झाली.

नैना क्षेत्रातील बांधकामे संरक्षित करणे व ग्रामस्थांच्या नैना विषयी सर्व अडचणी दूर करण्याची मागणी आ. विक्रांत पाटील यांनी सातत्याने केली असून या विषयात विशेष लक्षवेधी लावून शासनाचे लक्ष ही वेधून घेतले होते. त्यांच्या माध्यमातून या विषयाचा सतत पाठपुरावा सुरु असून या मागण्यांनुसार सिडको प्रशासनाने या विषयात सकारात्मकता दाखवली आहे, मग या विषयात खरेदी विक्री रेजिस्ट्रेशन सुरु करण्यासंदर्भात ही सिडको ने सकारात्मक भूमिका घ्यावी ही मागणीही आ. विक्रांत पाटील यांनी केली आहे. सदर विषयात तातडीने धोरण तयार करून नागरिकांना दिलासा द्यावा असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री सन्मा चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही सिडको व नोंदणी महानिरीक्षक यांना दिले.

एकंदरीत या विशेष बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याने या बरेच महिने रखडलेल्या नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या विषयात मार्ग निघण्याच्या अशा पल्लवीत झाल्या आहेत.
या बैठकीला मा. कोकण म्हाडा सभापती श्री. बाळासाहेब जी पाटील, सिडको अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, राज्याचे नोंदणी महा निरीक्षक (IGR) श्री रवींद्र बिनवाडे, सिडको व मुद्रांक शुल्क विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## बाभळी बंधारा बुडीत क्षेत्रातील शेतक-यांना मंजूर झालेले १८८ कोटी अनुदान तात्काळ वाटप करावे

### नारायण पाटील पवार यांची उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मागणी.

दैनिक युवक आधार
धर्माबाद प्रतिनिधी :
गिरमाजी सुर्यकार
धर्माबाद तालुक्यातील बाभळी बंधारा बुडीत क्षेत्रातील सुमारे ३६५ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना मंजूर झालेल्या १८८ कोटी मावेजा मिळाला नाही छत्रपती संभाजीनगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत ही रक्कम मंजूर करण्यात आली आणि तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे, अशी सूचना देण्यात आली पण अद्यापही शेतकऱ्यांना मावेजा मिळाला नाही. उच्च पातळी बाभळी बंधारा कार्यकक्षेत या जामिनी बुडीत क्षेत्र म्हणून गेल्या. गेल्या दहा वर्षापासून लाभमिळाला नव्हता मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव निमित्त १६ सप्टेंबर २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. तथा नरसी येथे २३/३/२०२५ रोजी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कडे या विषयावर



चर्चा देखील झाली.शेतकरी बांधवांना या रास्त मागणीला न्याय देत नैसर्गिक न्याय देत 188 कोटी रुपयांचा जमा असलेला निधी बाधित शेतकरी बांधवांना त्वरित वाटप करण्यासाठी प्रशासनाला आदेशित करावे अशी शेतकऱ्यांनी विनंती केली आहे बुडीत क्षेत्राखाली जमिनी गेल्या त्याचा मावेजा म्हणून १८८ कोटी ६२ लक्ष रुपये प्रस्तावित करून ही रक्कम मंजूर करण्यात आली पण पुढे काय? घडले हे मात्र कळेनासे झाले आहे. या गोष्टीला एक वर्षा पेक्षा अधिकचा कार्यकाळ लोटत आला असला तरी सदरील गोष्टीची पूर्तता अद्याप झाली नाही १६ ऑक्टोबर २०२३ रोजी शासन निर्णय काढून उपरोक्त बाभळी बंधा-याच्या विकासासंदर्भात तरतूद करण्यात आली व ७७१कोटी २० लक्ष रुपयांची मान्यता देण्यात आली.पण अद्यापही त्यासंदर्भात कुठलीच कार्यवाही होत नाही म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे बुडीत क्षेत्रातील शेतकरी लाभार्थ्यांना त्वरित तात्काळ मावेजा मिळावा अशी मागणी धर्माबाद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याअध्यक्ष नारायण पाटील पवार यांनी केली आहे .

## शब्दांचे गूढ जादूगार: कवी ग्रेस

ग्रेस कवींची झाली ओळख,
शब्दांनी बांधली सुंदर रेख!
गूढ भावनेचा घेतला स्पर्श,
काव्यसागराचा अज्ञात अर्थ!

रात्र कधी ती जागी होते,
कवितांमध्ये हुरहूर बोचते!
दु:खाचेही सौंदर्य हसते,
ग्रेसच्या ओळींच्या धुंदीत नाचते!

इन्ग्रिडच्या त्या नजरेसाठी,
ग्रेसने धरली शब्दांची छाती!
सोप्या ओळी, खोल अर्थ,
मनाला भिडणारा शब्दग्रह!

"वाऱ्याने हलते रान" त्यांनी गात,
जीवनाचे गुज हळूच सांगतात!
प्रेम, वेदना, आठवणी, गीत,
ग्रेसच्या काव्यात दडले हे मीत!

कधी असतो शब्दांमधला ज्वर,
कधी उधाणलेला नयनभर सागर!
काही उमगले, काही न उमगले,
पण मनोमन त्यांचे सूर लागले!

स्मृतिदिनी त्या कवीस वंदन,
शब्दसृष्टीस अर्पित नमन!
ग्रेस, तुझे काव्य अमर राहो,
मराठी हृदयात सदैव निनादो!

---------------------
... प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर
मु.पो. पिंपळनेर( गोपाल नगर) ता. साक्री जि. धुळे

## अक्षरा सामजिक प्रतिष्ठानचे महाराष्ट्रातील ५५ वे मोफत आरोग्य चिकित्सा शिबिर यशस्वीरीत्या संपन्न..!

दैनिक युवक आधार
मुंबई भोईवाडा-प्रतिनिधी गुरुनाथ तिरपणकर
अक्षरा सामजिक प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेने आतापर्यंत अनेक सामाजिक उपक्रम राबवून यशस्वितेची उंची गाठली आहे. त्याचाच एक भाग म्हणून संस्थेचे सल्लागार दिवंगत श्री .प्रदीप तु.मोहिते यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्रातील ५५ वे मोफत आरोग्य चिकित्सा शिबिर सोमवार दि.२४ /०३/२०२५ संस्थेचे मुंबई जिल्हा कार्यालय, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वसाहत (भोईवाडा बेस्ट कामगार वसाहत) जेरबाई वाडिया रोड परेल, भोईवाडा मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मोफत मधुमेह, रक्तदाब, इलेक्ट्रिक कार्डिओग्राम (ECG) तपासणीसह विविध आजारावर आयुर्वेदिक उपचार पद्धती मार्गदर्शन करण्यात आले. ह्या शिबिरास मुंबईच्या मा. महापौर सौ. श्रद्धा जाधव, मा. नगरसेवक श्री.सुनील मोरे, शिव आरोग्य सेना महाराष्ट्र सरचिटणीस श्री. जितेंद्र दगडू दादा सकपाळ, शिवडी विभागातील समाजसेविका सौ.रिया बावकर, सौ.योगिता काटे (वॉर्ड महिला वॉर्ड अध्यक्षा भाजप) उद्योजक श्री. रूपेश तरल, शिवसेना (शिंदे गट) चे युवा नेते निलेश राणे,सौ. वसुधा वाळुंज, सौ.सुवर्णा सावंत, सौ.पूजा बोटवाला युनिकेअर हेल्थ सेंटरचे श्री.रमेश कांबळे, आंबेडकरी चळवळीत ज्येष्ठ कार्यकर्ते चिंतामण खरे, बौद्धजन पंचायत समिती शिवडी विभाग गट क्रमांक १३ चे कार्याध्यक्ष संतोष दामाजी जाधव, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ३७२ चे अध्यक्ष नरेंद्र मोहिते, शिवप्रसाद गृहनिर्माण संस्थेचे श्री कमलनाथ केरकर, हरिश्चंद्र पांचाळ, आगरी समाज विकास संघाचे कोषाध्यक्ष श्री अनिल तांडेल, रेशनिंग कृती समिती चे संदीप सुमन, राकेश सकपाळ श्रीमती.योगिनी राऊत ताई (मनसे उप शाखा अध्यक्ष) शिव आरोग्य सेना शिवडी श्री.अनंत कोटकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच या उपक्रमास अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान मुंबई जिल्हा अध्यक्ष मान. संदिप मोहिते यांच्या नेतृत्वाखाली कु .सिद्धांत मोहिते, कु. प्रणित वीर, कु. सौरभ मोहिते, संकेत जाधव, कु.सम्यक मोहिते,प्रज्वल सकपाळ,स्नेहल मोहिते, भक्ती तांडेल,सोनल कांबळे, रेश्मा सकपाळ, मीनल असगोलकर, युनिकेअर हेल्थ सेंटर, आचरेकर डेकोरेटर्सचे प्रोप्रा.दिनेश आचरेकर ह्यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच ह्या आरोग्य शिबिरास स्थानिक मान्यवरांनी, स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली ह्या सर्वांचे आणि संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते ह्यानी शिबिर यशस्वी केल्याबद्दल अक्षरा सामजिक प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. अमोल वंजारे यांनी सर्वाचे आभार व्यक्त केले!!







## कांजुरमार्ग येथे संस्कृती प्रतिष्ठान (ट्रस्ट) मार्फत महागुढी सोहळा आयोजन



दैनिक युवक आधार
मुंबई(पंकजकुमार पाटील):

सण उत्साहाचा, सण मांगल्याचा,
सण मराठी अस्मितेचा, सण हिंदू संस्कृतीचा...
अर्थात गुढी पाडवा सण. कांजुरमार्ग येथील संस्कृती प्रतिष्ठान (ट्रस्ट) कडून "महागुढी सोहळा" कांजूर को. ऑप. सोसा. मैदान (क्रॉम्प्टन मैदान), गणपती मंदिर समोर, दातार कॉलनी, भांडुप (पू.), मुंबई या ठिकाणी मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला जाणार आहे.

यावर्षी या सोहळ्यात "इतिहास गडकिल्ल्यांचा, वारसा शिवकालीन संस्कृतीचा" हा विषय समोर ठेवून छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांच्या छायाचित्रांचे व शिवकालीन नाणी तसेच परदेशी आणि भारतीय नोटांचे प्रदर्शन, आदिलशाही लारीन नाणी आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे शंभुराई नाणे विशेष आकर्षण असलेले प्रदर्शन आयोजित केले आहे. शनिवार दि.२९ मार्च, २०२५ व रविवार दि.३० मार्च, २०२५ सकाळी १० ते रात्रौ. ९:३० वा.पर्यंत सुरू राहणाऱ्या या प्रदर्शनासाठी प्रवेश विनामूल्य असणार आहे.

तसेच दि.२९ मार्च रोजी सायं. ६ वा.पासून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे लेझीम व दांडपट्टा पथक यांचे शिवकालीन युद्धकला, लेझीम दांडपट्टा, तलवारबाजी व लाठी काठी इ. साहसी खेळ होणार आहेत तर रविवार दि.३० मार्च रोजी सायं. ६ वा.पासून शाहिरी गर्जना कला मंच कर्जत, रायगड प्रस्तुत महाराष्ट्र गौरव, रायगड भूषण शाहीर गणेश ताम्हाणे आणि सहकारी यांचा शाहीर पोवाडा कार्यक्रम होणार आहे.

तरी या महागुढी सोहळ्यास विभागातील व आसपासच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रदर्शन व विविध कार्यक्रमांचा आनंद घेऊन आपली संस्कृती जपावी-वाढवावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे.अधिक माहितीकरता संपर्क: